परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
# संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in
9881265102
संपादक - मोहन व्हावळे
बीड वर्षे- 10 वे | अंक क्र. 191
शनिवार दि. 26 जुलै 2025
पृष्ठे 4 किंमत 2 ₹
RNI: MAHMAR/2016/67060






समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

परळी संघर्षनेता

पर्यावरण वातावरण बदल व पशुसंवर्धन मंत्री
ना.पंकजाताई मुंडे
यांच्या वाढदिवसा निमित
हार्दिक शुभेच्छा



# संयमी नेतृत्व



पंकजाताई मुंडे...महाराष्ट्राच्या राजकारणातला एक वलयांकित चेहरा..एक दमदार, कणखर, आक्रमक व तितकच संयमी नेतृत्व म्हणूनही महाराष्ट्र त्यांना ओळखतो. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा सक्षम राजकीय वारसा समर्थपणे पुढे घेऊन जात असताना राजकारणा सोबतच समाजकारणातही कायम आघाडीवर असलेलं हे उमदे व्यक्तीमत्व.. समाजातील वंचित, पिडित घटकांच्या सेवेसाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले, त्या मुंडे साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांचे अधुरे स्वप्न पुर्ण करण्याचा ध्यास घेत, येणा-या प्रत्येक संकटावर मात करत अविरतपणे वाटचाल करणारे हे धुरंधर नेतृत्व आज सर्व सामान्य कार्यकर्त्यांचं प्रेरणास्थान बनलं आहे.

पंकजाताई मुंडे यांची राजकीय कारकीर्द सुरवातीपासून तशी संघर्षाचीच.. तरीही त्यावर स्वकर्तृत्वाने मात करत मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग त्यांनी लोकांच्या भल्यासाठीच केला. एक सरळमार्गी राजकारणी, जनतेच्या अडी- अडचणीला धावून जात त्यांच्या वेदना समजून घेण्याचं काम त्यांनी सातत्यानं केलं आणि करत आहेत. महाराष्ट्रातील लाखो- करोडो कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी अन् प्रेमाची भावना आहे, हिंच शक्ती त्यांना उर्जा देऊन जाते.

पंकजाताई कधी कोणाचं वाईट चिंतणार नाहीत की करणार नाहीत, त्या त्रास सहन करणाऱ्या पैकी आहेत, देणाऱ्या पैकी मुळीच नाहीत, ही भावना, हा आदर त्यांच्याविषयी सामान्य कार्यकर्त्यां मध्ये आहे.

लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणत, ज्यांचा कुणी वाली नाही, ज्यांची कुणी वाणी नाही अशा लोकांसाठी मी आहे, अगदी तोच आदर्श आणि तेच संस्कार पुढे घेऊन पंकजाताई राजकारण व समाजकारणात वाटचाल करत आहे. पंकजाताई हया जरी मुंडे साहेबांची लेक, त्यांच्या राजकीय वारसदार असल्या तरी आज राजकारणात त्यांनी जे स्थान निर्माण केले आहे, ते केवळ आपल्या स्वकर्तृत्वावर.., हे विसरुन चालणार नाही. पद अथवा सत्ता असो वा नसो, त्यांचं संघटना आणि सामान्य जनतेसाठी असलेलं काम अव्याहतपणे सुरुच असतं. 2019 ला विधानसभेत त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले पण त्या खचल्या नाहीत, पुन्हा तितक्याच नव्या जोमाने कामाला लागल्या, संघटन कार्यात स्वतःला झोकून दिले. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत बीडमधून त्यांना उमेदवारी मिळाली. इथे विरोधकांकडून अफाट जातीपातीचा विखारी प्रचार झाला, त्यातही त्यांनी कडवी झुंज दिली पण निसटता पराभव झाला. त्यानंतर आलेल्या विधानसभा निवडणुकीत हक्काचा परळी मतदारसंघ सुटला, पण न खचता त्या पक्षासाठी पुन्हा जोमाने कामाला लागल्या आणि जवळपास चाळीस मतदारसंघात त्यांनी भाजपचे आमदार निवडून आणले. तहान भूक विसरुन पक्षासाठी दिवसरात्र काम करताना स्वतःच्या आरोग्याकडेही त्यांनी लक्ष दिले नाही. शेवटी पक्ष नेतृत्वाला सुध्दा त्यांच्या कष्टाची दखल घेणे भाग पडले, त्यांना विधानपरिषदेवर संधी मिळाली. पुढे लगेच काही दिवसांनी भाजप महायुतीची सत्ता आली आणि त्यांना कॅबिनेट मंत्री पद मिळाले. संघटनेप्रती असलेली निष्ठा, अपार कष्ट करण्याची तयारी हे त्यांचं कर्तृत्व खरोखरच वाखाणण्यासारखं आहे.

## मिळालेल्या प्रत्येक संधीचं सोनं

पंकजाताईंना कोणतेही खाते मिळो, त्यात त्या अभ्यासूपणाने त्याचं सोनं करतातच, हे यापूर्वी देखील सिध्द झाले आहे. सामान्य जनतेशी फारसा थेट संबंध नसलेलं, कमी बजेटच

पर्यावरण व पशुसंवर्धन खातं त्यांना मिळालं पण त्यातही जबरदस्त काम करून त्यांनी आपला ठसा उमटवला. पशुसंवर्धनला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारं महाराष्ट्र हे देशातलंपहिलं राज्य त्यांनी केलं. पशुसंवर्धन अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याचा धाडसी निर्णय, मेंढपाळांच्या थेट खात्यात चराई अनुदान,परळी- बारामतीत पशुवैद्यकीय

महाविद्यालय, नो प्लास्टिक मोहीम, महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात बदल करून शेतीसाठी ई वाहन, वसुंधरा बचाव अभियान आदी महत्वाचे निर्णय त्यांनी मंत्रीपदाच्या केवळ सहा महिन्यांत घेतले, त्यांचं नियोजनबद्ध आणि गतिशील कामाचे यापेक्षा दुसरे उदाहरण काय असू शकेल. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात पंकजाताई मुंडे यांच्या लढावू बाण्याचे दर्शन सभागृहाला झाले. एकच विषय घेवून विरोधी व सत्ताधारी आमदारांकडून त्यांचेवर प्रश्नांची चौफेर सरबत्ती करण्यात आली पण त्यांनी अशी काही खिंड लढवली की, त्यांनी दिलेल्या उत्तराचे उपसभापतींनी देखील जाहीर कौतुक केलं, ही खरं तर त्यांच्यातील अभ्यासू गुणांची चुणूक म्हणावी लागेल.

## नेता मिळे आम्हा ऐसा, मग काय असे उणे..!

पंकजाताईंच नेतृत्व सर्वांनाच हवहवसं वाटणार असं आहे. लोकसभेत निसटता पराभव झाल्यानंतर त्यांचे समर्थक सैरावैरा झाले. त्यांचा पराभव जिव्हारी लागल्याने पाच तरुणांनी स्वतःचा जीव दिला. या घटनेने त्यांना खूप वेदना झाल्या, त्यांनी या तरुणांच्या परिवाराची भेट घेऊन त्यांना मायेचा आधार दिला. मध्यंतरी गेवराई तालुक्यात एका तांड्यावरील ऊसतोड मजूर दाम्पत्य अपघातात मृत्यूमुखी पडले, त्याच्या कुटूंबाचाही त्या आधार बनल्या. बीड मधील भाजपचे विस्तारक बाबासाहेब आगे यांची हत्या झाल्यानंतर त्याही परिवाराच्या मदतीला त्या धावल्या. सामान्य माणूस असो की कार्यकर्ता प्रत्येकाला आपलं वाटणार त्यांच नेतृत्व आहे, वंचितांच्या या माऊलीला सर्वांनी जपावं. पंकजाताईचे नेतृत्व भविष्यात एका मोठ्या उंचीवर जावं ही प्रत्येकाची इच्छा आहे. गोरगरीब, सामान्य माणसाचे आशीर्वाद त्यांच्या पाठिशी असल्याने ही इच्छा नक्की पूर्ण होईल यात तीळमात्र शंका नाही.

**प्रदीप कुलकर्णी**



# घेतला वसा टाकणार नाही.!!



"पराभवानं खचायचं नाही अन् विजयाचा उन्माद नाही,उतरणार नाही, मातणार नाही,

जन सेवेचा घेतला वसा टाकणार नाही!"

हे केवळ शब्द नव्हेत, तर हे पंकजाताई मुंडे यांच्या संघर्षशील, निष्ठावान, लोकाभिमुख राजकीय प्रवासाचं सार आहे. जनसामान्यांच्या मनामनांत आदराची

जागा निर्माण करणाऱ्या या करारी नेत्या, आज आपल्या राजकीय प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा पार करत आहेत. लोकनेत्या, राज्याच्या मंत्री, भारतीय

जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसाचं औचित्य साधून राज्यभर विविध उपक्रम राबविले जातात. आज त्यांच्या वाढदिवसाच्या

निमित्ताने काही लिहिण्याचा प्रयत्न..

लोकनेते गोपीनाथ मुंडे हे महाराष्ट्राच्या जनतेसाठी केवळ एक राजकारणी नव्हते, ते लोकांच्या आशा-आकांक्षांचं प्रतिक होते. त्यांच्या निधनानंतर

जेव्हा पंकजाताईंनी "मी रडणार नाही, लढणार आहे" असं म्हटलं, तेव्हा ती केवळ घोषणा नव्हती – तो त्यांच्या आयुष्याचा संकल्प बनला.

वडिलांची जागा कधीही भरून न निघणारी होती. पण त्यांचं कार्य, त्यांची स्वप्नं, त्यांनी रुजवलेली मूल्यं – याचं जपणं पंकजाताईंनी स्वतःचं

जीवनध्येय केलं. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचं नाव घेतलं की ग्रामीण महाराष्ट्र, विशेषतः मराठवाडा डोळ्यासमोर येतो. त्यांच्या घरातूनच पंकजाताईंना

राजकारणाचं बाळकडू मिळालं. वडिलांच्या छायेत राजकारण शिकताना त्यांनी काय शिकावं, कसं वागावं, कार्यकर्त्यांशी नातं कसं ठेवावं – याचे धडे प्रत्यक्ष

कृतीतून घेतले.

वडिलांनी लोकसभेची वाट धरल्यावर परळी विधानसभेतून त्या आमदार झाल्या. केवळ उमेदवारी नव्हे तर विजय आणि कार्यक्षमता याने त्यांनी सर्वांचं लक्ष

वेधून घेतलं. वडिलांच्या सहवासात त्यांनी शिस्त, संयम आणि लोकसेवेचं बाळकडू घेतलं आणि दिवसभर कितीही थकवा असो, कार्यकर्त्यांच्या प्रश्नांना वेळ

द्यायचाच! हा जीवनाचा मूलमंत्र बनवला.

राजकारणात सुरवातीलाच ताईंनी आमदार म्हणून एन्ट्री केली, ती साहेबांनी लोकसभेत जाण्याचा निर्णय घेतल्याने परळी मतदार संघातून.पाच

वर्षाच्या कालावधीत त्यांनी मतदार संघातीलच नव्हे तर जिल्हाभरात कार्यकर्त्यांची फळी उभी केली. आमदार म्हणून काम करताना त्यांना वडिलांकडून धडे

मिळाले ते म्हणजे दिवसभर काम करताना कामाचा ताण, व्याप असला तरी शेवटच्या नागरिक, कार्यकर्त्यांचा प्रश्न समजून घेतल्याशिवाय आराम करायचा

नाही! अशा शिस्तीचे धडे मिळाले.

मुंडे कुटुंबात याच दरम्यान वादळ आलं. मात्र या लेकीने साहेबांच्या खांद्याला खांदा लावून झंझावात सुरु ठेवला. पुढे

2014च्या लोकसभेत वडिलांचा दणदणीत विजय झाला, केंद्रात देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपची सत्ता आली. गोपीनाथ मुंडेंना केंद्रात

मंत्रीपद देखील मिळालं मात्र ते औटघटकेचे ठरले. वडिलांच्या अपघाती मृत्युने दु:खाचा डोंगर कोसळला. मात्र मी रडणार नाही, लढणार आहे म्हणत त्यांनी

जबाबदारी संपूर्णपणे खांद्यावर घेऊन राज्यभर परिक्रमा सुरु केली.

स्वतःचा परळी मतदार संघातून विजय मिळवला सोबतच झालेल्या पोटनिवडणुकीत बहिण डॉ.प्रीतम मुंडे यांना लोकसभेत पाठविले.राज्यात

भाजपची सत्ता आली आणि पंकजाताईंकडे ग्रामविकास, जलसंधारण सारख्या महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी आली. ती त्यांनी समर्थपणे पेलली आणि

राज्यात विकासकामांचा धडाका सुरु ठेवला. कार्यकर्त्यांची मोठी फळी पक्षात उभी केली. स्वकीय आणि विरोधकांच्या खेळीने 2019 च्या विधानसभा

निवडणुकीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. त्यातच पक्ष नेतृत्वाकडूनही दुर्लक्ष झाले. या बॅडपॅचच्या काळात ग्रहदशा खराब सुरु झाली. पण न

डगमगता, न खचता आपले काम सुरु ठेवले.

पंकजा मुंडेंना दुर्लक्षित करून चालणार नाही हे लक्षात आल्यावर काही काळानंतर पक्षाने त्यांना केंद्रीय कार्यकारिणीत स्थान देत राष्ट्रीय सचिव

पदी नियुक्ती केली,सोबतच मध्य प्रदेश राज्याच्या प्रभारीपदाची जबाबदारी दिली. दिलेली जिम्मेदारी तेवढीच समर्थपणे पार पाडतानाच त्यांना

उज्जैन,महाकाल, नलखेडा बगलामुखी या देवस्थानाला भेटी देण्याचा योग आला आणि अमुलाग्र बदल दिसू लागला. या सोबतच भगवान भक्ती

गडावरूनदिलेली ललकारी राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्यांना सहजपणे पोहोचली. यातून मुंडे साहेबांप्रमाणेच पंकजाताईंनी देखील सोशल इंजिनिअरिंग

साधण्याचा यशस्वी प्रयोग केला. पक्षासाठी केलेल्या कामासोबतच जनसामान्यांचे प्रश्न समजून घेत संपर्क सुरूच ठेवला.

मध्य प्रदेशात प्रभारी म्हणून केलेलं काम ठसा उमटविणारं ठरलं. इथल्याही जनतेशी जोडलेली नाळ तुटू न देता, अध्यात्मिकतेची जोड देत संयमाने

काळ घालवला.दरम्यान अलिकडेच राष्ट्रवादी काँग्रेस भाजपासोबत सत्तेत सहभागी झाली. परळीत मुंडे बंधू भगिनी एकत्र आले.

2019 प्रमाणेच 2024 मध्ये लोकसभा निवडणुकीत देखील पंकजाताईंना दगाफटका झाला.जातीपातीच्या राजकारणात त्यांना पराभूत व्हावे लागले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी यावेळी ताईंना शपथविधी सोहळ्याला निमंत्रित केले. त्यांच्या कामाची पक्षपातळीवर दखल घेतल्या जाऊ लागली. विधानसभेआधीच

त्यांची विधान परिषदेवर वर्णी लागली आणि भाजप महायुती सत्तेत येताच त्यांना मंत्रीपद देखील मिळालं. राज्याच्या पर्यावरण, पशू संवर्धन खात्याच्या मंत्री

म्हणून एकापेक्षा एक सरस निर्णय घेताना आपण पंकजाताईंना पाहात आहोत. आगामी काळात त्यांच्यावरील जबाबदारी नक्कीच वाढेल, समाजातील वंचित

घटकांना न्याय देण्याचं काम त्या जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री आणि राज्याच्या कॅबिनेट मंत्री म्हणून करताना दिसतात.

**मुकुंद कुलकर्णी**
**9881135980**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
# संघर्षनेता

पर्यावरण वातावरण बदल व पशुसंवर्धन मंत्री
ना.पंकजाताई मुंडे
यांच्या वाढदिवसा निमित
हार्दिक शुभेच्छा



# ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज भरगच्च कार्यक्रम

## भाजपच्या वतीने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांना नागरिकांनी उपस्थित राहावे- सौ. उमाताई समशेट्टी



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) पर्यावरण हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाच्या वतीने उद्या शनिवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या नेत्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा द्याव्यात असे आवाहन भाजपाच्या शहराध्यक्ष उमाताई समशेट्टी यांनी केले.

ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपच्या वतीने सामाजिक सेवा उपक्रम साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत उद्या शनिवार दि. 26 रोजी शहरात विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी 7 वा. ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिर येथे श्री वैद्यनाथ प्रभुस महाअभिषेक करण्यात येणार आहे तर 7.30 वा. शनैश्वर मंदिरात (श्री वैद्यनाथ मंदिर पायथ्याशी) महाआरती केली जाणार आहे. सकाळी 8 वा. अन्नपूर्णा देवीस आरती, श्रीराम मंदिर (बालाजी मंदिर) परळी. त्यानंतर सकाळी 8.30 वाजता बंगला गल्ली येथे हुसेन शहावली दर्गा येथे चादर चढवण्यात येणार आणि

सकाळी 8.30 बंगला गल्ली, परळी वैजनाथ तर 9 वाजता भीमनगर येथील बुद्धविहार येथे बुद्ध वंदना होणार आहे. सकाळी 10 वाजता वैद्यनाथ विद्यालयात शालेय विद्यार्थ्यांना ड्रेस व वही वाटपाचा कार्यक्रम होणार आहे.

उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना सकाळी 11 वाजता फळ वाटपाचा कार्यक्रम होणार आहे.



सकाळी 11:30 वाजता ना. पंकजाताई मुंडे यांच्या अरुणोदय मार्केट मधील संपर्क कार्यालयांमध्ये स्वच्छता कर्मचारी महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांना ज्येष्ठ नेते, प्रमुख पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख, महिला आघाडी सह सर्व आघाडी, संस्थेचे पदाधिकारी व सदस्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी केले आहे.

### पत्रकार विलास बडे यांच्या व्याख्यानास उपस्थित रहावे



दरम्यान ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सामाजिक सेवा उपक्रमांतर्गत उद्या रविवार दि. 27 जुलै रोजी सकाळी 11 वाजता नामांकित पत्रकार विलास बडे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे होणाऱ्या कार्यक्रमात विलास बडे हे विविध विषयांवर आपली भूमिका मांडणार आहेत. या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी केले आहे.

# धनंजय मुंडे पुन्हा मंत्री होणार? अजितदादांचं मोठं वक्तव्य



राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, कृषी विभागाच्या आरोपांवर धनंजय मुंडे यांना न्यायालयानं क्लिनचिट दिल्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा त्यांना मंत्रिपदी संधी देणार असल्याचे संकेत दिले आहेत. कराड प्रकरणातून मुंडेंना क्लिनचीट मिळाल्यानंतर त्या प्रकरणाशी त्यांचा संबंध नसल्याचं सिद्ध झाल्यानंतर आम्ही त्यांना पुन्हा मंत्रिपद देऊ, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली आहे. धनंजय मुंडेंच्या बाबतीमध्ये तुम्ही पेपरला वाचलं, त्यांच्यावर कृषी विभागाचे जे आरोप झाले त्यावर न्यायालयानं काय सांगितलं? त्यांना त्या प्रकरणात क्लिनचिट देण्यात आली, त्या प्रकरणात त्यांचा कुठेही दोष नाहीये, आता अजून त्यांच्या संदर्भातील एक गोष्ट आहे, त्यावर देखील पोलीस यंत्रणा त्यांच्या पद्धतीनं कारवाई करत आहे, या प्रकरणात जर त्यांना क्लिनचिट मिळाली तर आम्ही त्यांना पुन्हा मंत्रिपद देऊ असं अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटलं आहे.

# धोकादायक : इथं 25 वर्षाच्या तरुणांकडे गावठी कट्टे

परळी तालुक्यातील सिरसळा येथे पोलिसांनी धडक कारवाई करत विनापरवाना पिस्तूल बाळगणाऱ्या तीन जणांना ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. स्थानिक पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, काही व्यक्ती सिरसळा परिसरात बेकायदेशीरपणे शस्त्रे बाळगून आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचला.मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक 22 जुलै मंगळवार रोजी 8:15 वाजणेच्या सुमारास सिरसाळा ते मोहा जाणारे रोडवरील खदानीजवळ इसम नामे 1) राम अभिमान धोत्रे वय 30 वर्षे रा. सिरसाळा ता. परळी वै. याने अवैद्य बेकायदेरित्या 2) करण मरगु कुऱ्हाडे, 3) अशोक तुकाराम पवार दोन्ही रा. सिरसाळा ता.परळी वै. यांचेकडुन गावठी देशी कटटा (पिस्टल) खरेदी करुन जवळ बाळगत असतांना मिळुन आला म्हणुन साहाय्यक पोलिस निरीक्षक गोरखनाथ बाबासाहेब दहीफळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी क्र.1 रामा अभिमान धोतरे, अरोपी क्र.2 करण मरगु कुऱ्हाडे, अरोपी क्र.3 अशोक तुकाराम पवार सर्व राहणार सिरसाळा यांच्या विरुद्ध गु.र.न.204/2024 कलम 3,5,25 शस्त्र अधीनियम 1959 आर्म अॅक्टप्रमाणे गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक आनंद जाधव करत आहे. व तसेच गावठी कट्टा खरेदी करण्याचा त्याचा उद्देश काय होता आणि यामागे आणखी कुणाचा सहभाग आहे का, याबाबत पोलीस कसून चौकशी करत आहेत.

# महादेव मुंडेंचे खुनी 19 महिन्यांनंतरही मोकाट; अटकेसाठी ग्रामस्थांचा भरपावसात रास्तारोको





परळी : येथील व्यापारी महादेव दत्तात्रय मुंडे यांचा निर्घृण खून झाल्याच्या घटनेस 19 महिने उलटले, तरी अद्यापही आरोपी मोकाट आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या सासर आणि माहेरच्या ग्रामस्थांनी एकत्र येत 25 जुलै रोजी परळी-अंबाजोगाई रस्त्यावरील कन्हेरवाडी येथे रास्ता रोको आंदोलन छेडले. यावेळी ज्ञानेश्वरी मुंडे व त्यांचे नातेवाईकही सहभागी झाले आहेत. या आंदोलनात कन्हेरवाडी (माहेर) आणि भोपळा (सासर) येथील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. जोरदार पावसातही आंदोलन ठामपणे सुरु ठेवत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. पोलीस प्रशासनाला पूर्वसूचना देत आंदोलनाचा इशारा आधीच देण्यात आला होता. या आंदोलनात मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख, विजयसिंह उर्फ बाळा बांगर, रिपाई (खरात गट) चे नेते सचिन खरात, तसेच कन्हेरवाडीचे सरपंच राजेभाऊ फड आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त करत म्हटले, “महादेव मुंडे खूनप्रकरणातील आरोपींना अटक झालीच पाहिजे. वाल्मीक कराड व त्याच्या टोळीने घडवलेला हा गुन्हा आहे. सर्व प्रकरणाचा संपूर्ण पोलखोल आम्ही करणार आहोत. आम्ही मागे हटणार नाही. धनंजय देशमुख यांनीही आंदोलनस्थळी उपस्थित राहून ग्रामस्थांना पाठिंबा दिला. या प्रकरणातील एकही आरोपी सुटू नये, सर्वांना शिक्षा झालीच पाहिजे. ग्रामस्थांनी ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

सचिन खरात यांनी सरकारवर थेट आरोप करत म्हटले, या घटनेला जवळपास 20 महिने झाले, तरीही आरोपींना अटक झालेली नाही. हे सरकार झोपेत आहे का? पीडित कुटुंबाला त्वरित न्याय मिळाला पाहिजे.”

महादेव मुंडे यांच्या खुनाच्या प्रकरणाचा तपास संथगतीने सुरु असून, या प्रकरणी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करून आरोपींना तातडीने अटक करावी, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी होती.

# ना. पंकजाताई मुंडेंच्या निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी परळी भाजपच्यावतीने होमहवन

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सामाजिक सेवा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना स्नेहभोजन, शालेय साहित्य वाटप







परळी वैजनाथ

पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित शहर भाजपच्या वतीने सामाजिक सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आज शुक्रवार, दि. 25 जुलै रोजी आर्य समाज येथे होमहवन, विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे सरस्वती विद्यालय आणि जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन परळी शहरात चालू आहे. त्या अंतर्गत आज आर्य समाज येथे ना. पंकजाताई मुंडे यांच्या दीर्घायुष्यासाठी होमहवन करण्यात आले. आर्य समाज येथे ज्ञानार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन देण्यात आले. या होमहवनसाठी जेष्ठ नेते जुगलकिशोर लोहिया, भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, दीनदयाळ बँकेचे उपाध्यक्ष अॅड. राजेश्वर देशमुख, प्रितेश तोतला, नितीन समशेट्टी, प्रा. पवन मुंडे, अश्विन मोगरकर, प्रशांत कराड, अनिष अग्रवाल, अच्युत जोगदंड, मोहन जोशी, सुशील हरंगुळे, योगेश पांडकर, बंडू नाना कोरे, राहुल घोबाळे, उमेश निळे, राजेश दाड, चंदाताई ठोंबरे, सारिका कुरील, शैलजा अदोडे उपस्थित होते.

सरस्वती विद्यालय आणि जि. प. शाळेत शालेय साहित्याचे वाटप

सरस्वती विद्यालय व जिल्हा परिषद शाळा येथे वह्या वाटप करून विद्यार्थ्यांना ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू विद्यार्थ्यांसाठी आम्ही कायम उभे रहाण्याचा संकल्प शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी यावेळी दिला. शाळेतर्फे भारतीय जनता पक्षाच्या उपस्थित पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केल्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी शराध्यक्षा उमाताई समशेट्टे, उमेश खाडे, प्रशांत कराड, अश्विन मोगरकर, नितीन समशेट्टे, पवन मोदानी, खालेद राज, ज्ञानोबा सुरवसे, अच्युत जोगदंड, राहुल घोबाळे, उमेश निळे, जितेंद्र मस्के, अनिस शेख, दिलीप नेहरकर, राजेश कौलवर, खदीर भाई, श्रीपाद शिंदे, अस्लम खान आदी उपस्थित होते.

# पुन्हा राज गर्जना! मनसेचा रविवारी मुंबईत मेळावा, राज ठाकरे करणार मार्गदर्शन



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची तोफ पुन्हा एकदा धडाडणार आहे. मनसेच्या मुंबईतील पदाधिकाऱ्यांचा मेळावा रविवार 27 जुलै रोजी पार पपडणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे या मेळाव्याला उपस्थितीत राहणार असून ते पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात सायंकाळी 5 वाजता मेळावा या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मनसेच्या या मेळाव्याला मनसेचे नेते, सरचिटणीस तसेच मुंबईतील विभाग अध्यक्ष, उपविभाग अध्यक्ष, शाखाध्यक्ष, मुंबईतील सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा मेळावा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे. या मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे पदाधिकाऱ्यांना काय कानमंत्र देणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. मनसेच्या या मेळाव्यात राज ठाकरे नेमकं काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या मेळाव्यात मुंबई महापालिका निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच ज्या कमकुवत बाजू असतील त्या दुरुस्त करण्याचे काम केले जाणार आहे. याबाबत राज ठाकरे पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शिवसेना ठाकरे गट-मनसेने हिंदी सक्ती विरोधात एकत्र येण्याचा निर्णय घेतलेला आहे. मात्र या दोन्ही पक्षांची निवडणूकीबाबत कोणतीही युती अद्याप झालेली नाही. त्यामुळे या मेळाव्यात राज ठाकरे युतीबाबत बोलणार का? याबाबत सर्वांच्या मनात उत्सुकता आहे. हे दोन्ही पक्ष जरी एकाच मुद्यासाठी एकत्र रस्त्यावर उतरले होते, मात्र अद्याप त्यांच्या युतीची घोषणा झालेली नाही.

# फोन पे वरून जबरदस्तीने पैसे काढणाऱ्यास अंबाजोगाई शहर पोलिसांनी केले अटक

## अंबाजोगाई पोलिसांची तत्परता अवघ्या दोन तासात केले अटक



अंबाजोगाई (प्रतिनिधी) पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर, जिल्हा बीड यांची यशस्वी कारवाईत दि. 22/07/2025 रोजी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे फिर्यादी सोमनाथ मदन ढगे (राहणार कोळ कानडी)तालुका अंबाजोगाई व्यवसाय गॅरेज चालक यांच्या तक्रारीवरुन गुन्हा रजिस्टर नंबर 377/2025 भा.दं.सं. कलम 309(4), 3(5) BNS नुसार गुन्हा नोंदविण्यात आला होता. फिर्यादी यांचे ₹84,009/- रुपये फोन पे वरून जबरदस्तीने काढून घेण्यात आले होते. या प्रकरणात आरोपी: अविनाश शंकर देवकर (वय 32, रा. वडारवाडा, अंबाजोगाई) अजहर अब्दुल रहमान पठाण (वय 32, रा. पेन्शनपुरा, अंबाजोगाई) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हा लक्षात घेऊन पोलीसांनी तात्काळ कारवाई करत अवघ्या 2 तासांत दोन्ही आरोपींना अटक केली व फिर्यादीकडून जबरदस्तीने घेतलेले ₹84,009/- रुपये हस्तगत करण्यात आले .

सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक मा. श्री नवनीत कावत साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कारवाईत अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड , सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे, पोलीस उपनिरीक्षक रविकुमार पवार ,आनंद शिंदे, पोलीस अंमलदार श्रीकृष्ण वडकर, मनोज घोडके, रवी कुमार केंद्रे, हनुमंत लाड, हनुमंत चादर, पांडुरंग काळे, भागवत नागरगोजे सहभागी होते.

# बिबट्या पाळीव प्राण्यांना भक्षक बनवतोय सतर्क रहा



बालाजी जगतकर बीड - “बीड तालुक्यातील वांगी परिसरात बिबट्याच्या भक्षक बनण्याच्या घटना चिंताजनक आहेत. बालासाहेब गोरख हाडूळे यांची 11 शेळ्या बिबट्याने ठार मारली आहे, आणि यापूर्वीही एका वासराचा बळी घेतल्याची घटना घडली आहे.

संबंधित गावांतील शेतकऱ्यांनी विशेष सावधानी बाळगणे आवश्यक आहे, विशेषत: वांगी, शिवणी, काठोडा, भवानवाडी, कुटेवाडी, जरुड, बाभळखुंटा, बोरफडी, हिवरा, मौजवाडी, मौज, बकरवाडी, घाटसावळी, पोखरी, आणि मैंदा या गावांमध्ये.

शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांचे संरक्षण करण्यासाठी आणि शेती कामे करताना अधिक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वन विभागाशी या घटनेबाबत संवाद साधण्यात आला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी सतर्क राहून सहकार्य करणे गरजेचे आहे. या गंभीर परिस्थितीत सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करून आपल्या आणि आपल्या जनावरांच्या सुरक्षेसाठी सक्रिय राहणे आवश्यक आहे. आपल्या जागरुकतेमुळे उन्नती साधता येईल आणि संकटांचा सामना करणे शक्य होईल.”



बीड - उद्योजक तथा वंचित बहुजन आघाडीचे महासचिव खंडू जाधव यांचा वाढदिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे साजरा करण्यात आला याप्रसंगी शाल श्रीफळ पुष्पहार संपादक बालाजी जगतकर, संपादक राजू जोगदंड, वंचित जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, अशोक वीर, पुरुषोत्तम वीर,लखन काका जोगदंड, किशोर वडमारे,कपिल सौदा, मनोज वाघमारे आदीनी सत्कार केला.

परळी

# संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

पर्यावरण वातावरण बदल व पशुसंवर्धन मंत्री

## ना.पंकजाताई मुंडे

यांच्या वाढदिवसा निमित

हार्दिक शुभेच्छा



# समंजस पंकजा



** आज 26 जुलै,महाराष्ट्राच्या वाघिणीचा,संघर्ष कन्येचा ,

महाराष्ट्राच्या एका महान मंत्र्याचा, अहो,माझी विद्यार्थिनी पंकजा गोपीनाथ राव मुंडे यांचा वाढदिवस !

या वाढदिवसानिमित्त ताई साहेबा बद्दल दोन शब्द लिहावे असं वाटलं,म्हणून पेन, कागद हाती घेतला तेंव्हा पंकजाताई बद्दल काय लिहावं हा प्रश्न पडला नाही

तर मी काय काय लिहावे असा प्रश्न मला पडला.

** मी पंकजाचा सातवी,आठवी चा शिक्षक म्हणून कधी एकेरी उल्लेख आल्यास कृपया माफ करा.

पंकजा बद्दल लिहिताना मला प्राथमिक इयत्तेत असताना शिकलेली कविता आठवली. त्या कवितेचे शिर्षक होते-" नदी आणि कवी"

त्या कवितेच्या ओळी,

" असो कवीचे कुळ अप्रसिध्द,<br>
होई कवीच्या कवने प्रसिद्ध<br>
तसे नदीच्या उगमस्थळाला नदीमुळे गौरव लाभ झाला "

अहो गंगेमुळेच गंगोत्री व यमुनेमुळेच यमनोत्रिचे महत्व !

स्व. मुंडे साहेबांचे वडील म्हणजे एक सामान्य शेतकरी.पण पुढे साहेबांमुळेच मुंडे साहेबांच्या कुळाला ,नाथरेकर मुंडे घराण्याला गौरव लाभ झाला व तोच वारसा

त्यांची लाडकी लेक पंकजा पुढे चालवित आहे. या कवितेच्या शेवटच्या ओळी अशा आहेत,

" राष्ट्रे बुडाली,नृप थोर गेले,<br>
नदी कवी मात्र अनंत ठेले<br>
भागीरथीला खळ लेश नाही,<br>
अखंड रामायण लोक गाई"

....महाराष्ट्राच्या राजकारणात कितीही उलथापालथ झाली,तरी स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांचे नाव अग्रक्रमाने लोकांच्या तोंडी येणारच.पुढे पंकजाताईंनी तोच

वारसा जोपासला व चालविला व त्यांना जोड मिळाली ,त्यांची लाडकी-धाकटी बहिण प्रीतमताई यांची ...!

.....मी पंकजाचा सातवी,आठवीचा शिक्षक म्हणून मी त्यांच्या राजकारण, समाजकारण व अन्य बाबीवर न लिहिता एक विद्यार्थिनी व व्यक्ती म्हणून पंकजा

काय होती व आहे ते व वर्गातले व बाहेरचे प्रसंग व किस्से सांगणार आहे.

.....□□ पंकजा एका मोठ्या राजकारण्याची लेक.पण तुम्हाला आश्चर्य वाटेल,पंकजा शाळेत वा माझ्याकडे ट्यूशन ला येताना कधीच मोठ्या गाडीत आली नाही

तर इतर मुलीबरोबर सायकलवरच यायची. तिनं तिचे वेगळेपण कधीच दाखवलं नाही.

सर्व सुखसोयी पायाशी असताना सुध्दा सामान्या सारखे राहणे हेच तर पंकजेचे वेगळेपण.

....प्रत्येक व्यक्तीलाच आपल्या आईवडीलांबद्दल प्रेम व माया असते पण पंकजाला वडिलांबद्दल नुसते प्रेम व माया नव्हती तर त्या चिमूरडीला वडीलांचा फार

मोठा अभिमान होता व आहे .

मी सातवीच्या वर्गात इंग्रजी शिकवित होतो.

एका तासिकेत मी कांही वाक्यप्रचाराचे म्हणजे phrases चे विद्यार्थ्यांकडून वाक्यात उपयोग करून घेत असताना मी To be proud of या phraseचा वाक्यात

उपयोग करावयास सांगितला, बऱ्याच विद्यार्थ्यांनी निरनिराळी वाक्यें सांगितली पण मला आजही आठवते,त्या phraseचा " I am proud of my father." असा

वाक्यात उपयोग पंकजाने केला होता.

आजही पंकजाला तिच्या वडिलांबद्दल किती अभिमान वाटतोय् ते तुम्हा-आम्हाला पंकजाच्या प्रत्येक भाषणातून,बोलण्यातून जाणवते.अहो ,तुम्हा आम्हाला

सुध्दा त्यांचा अभिमान वाटतो ,ही तर त्यांच्या पोटची पोर !!..

....पंकजा अभ्यासात खूप हुशार व तितकीच किंबहूना त्यापेक्षा जास्त समंजस !

पंकजा भोवती मुलां-मुलींचा नेहमीच गराडा असायचा. अगदी 12,13 वर्षांची पोर पण पंकजा भोवती एखाद्या नेत्या भोवती असावा असे मित्रमैत्रिणींचे कोंडाळे

असायचे.प्रत्येकालाच तिची मैत्री हवीहवीशी वाटायची.

हरिवंशराय बच्चन यांची एक रचना आहे,

" बिकी तेरी दोस्तो,तो पहले खरीददार हम होंगे<br>
तुम्हे मालूम नहीं तुम्हारी कींमत,<br>
पर तुमको पा कर सबसे अमिर हम होंगे ! "

..सर्वांना असेच वाटत असावे.पंकजाचा सेन्स ऑफ ह्युमर फार भारी !

एक किस्सा सांगतो , नेहमी प्रमाणेच आठवीच्या वर्गावर म्हणजे पंकजाच्या वर्गावर गेलो.मुलांमुलींचा शिकण्याचा मुड नव्हता.माझ्या अगोदरच्या तासात काय

झालं होतं मला माहिती नव्हतं..

मी शिकविणे सुरु केल्यावर सुध्दा मुलांचे हसणे थांबेना.मी सगळ्या ट्रीक्स् वापरल्या ,पण छे ! त्यांचा धिंगाणा सुरुच. मी ही वैतागलो,चिडलो व चिडून म्हणालो ,

मी शिक्षक नाही, गाढवराख्या आहे .असे म्हणताच सगळे विद्यार्थी जास्तच चेकाळले.पण अपवाद होता फक्त पंकजाचा.ती म्हणाली, " अरे! हसू नका ,सर जर

स्वतःला गाढवराख्या म्हणतायेत तर मग आपण कोण ???

आणि मग तात्काळ वर्ग शांत झाला.

पंकजाचा वर्ग आठवा अ.

त्या तुकडीची विद्यार्थी संख्या 60 ऐवजी 70 च्या पुढे गेलेली, वर्गात जागा कमी पडायची.नवीन येणाऱ्या कोणत्याही पालकाला आपला पाल्य "अ" मध्येच

असावा असे वाटायचे.त्याची कारणें दोन.एक म्हणजे "अ"ही तुकडी हुशार मुलांची असते असा समज व दुसरे कारण म्हणजे साहेबांची मुलगी त्या वर्गात आहे.

शेवटी आम्ही असा निर्णय घेतला ,"अ"तुकडीला "ड"असं नाव दिलं.तेव्हा कुठे त्या तुकडीत प्रवेश घेणाऱ्यां मुलांची आवक थांबली...

पंकजाताई ग्रामविकास मंत्री होत्या.त्यांनी व त्यांच्या त्या काळातील दहावीत असणाऱ्या सर्व वर्ग मित्रमैत्रिणींनी स्नेहमीलन म्हणजे गेट-टू-गेदर भरविले.त्या

दिवशी पण त्यांनी बसल्या ठीकाणी 'अ' व 'ड' चा किस्सा सांगितला.

मी स्टेजवर त्यांच्या जवळच बसलो होतो .

त्या म्हणाल्या , मी 'ड' मध्ये होते. मी मुद्दामच त्यांना म्हणालो, अहो ,ताई, आमच्या ड चे विद्यार्थी एव्हढे मोठे आहेत तर कल्पना करा ," अ" चे कसे असतील !

असं ऐकून घेईल ,तर ती पंकजा कसली !

क्षणाचाही विलंब न करता,ताई म्हणाल्या ," अहो सर , ड चेच विद्यार्थी आमदार ,खासदार, मंत्री होतात, "अ" चे फार-फार तर डॉक्टर, इंजीनियर, कलेक्टर

होतात.

तर अशी हजरजबाबी आमची शिष्या..

पंकजाताई आजही त्यांच्या गुरुंना विसरल्या नाहीत. त्या नेहमीच शाळेची

**नानासाहेब कवडे (गुरूजी) परळी-वैजनाथ, 9767540397**

आठवण

काढतात,त्यांच्या गुरुंची विचारपूस करतात.

गुरुपौर्णिमा आणि शिक्षक दिनी,पांच सप्टेंबर ला आमची प्रत्यक्ष भेट घेऊन, आमचा सत्कार करून शुभेच्छा देतात.प्रत्यक्ष भेट शक्य नसेल तर एखादे पत्र

पाठवून आमचे अभीष्टचिंतन करतात.

मला खरंच नवल वाटते,ताई तुमचे.एवढ्या मोठ्या व्यापातून सुध्दा तुम्हाला आमची आठवण होते.

'धन्य आहात तुम्ही ,' असं मी म्हणणार नाही,मी म्हणेल धन्य आहोत आम्ही की आम्हाला अशी शिष्या लाभली.

हे अभीष्टचिंतनाचे पत्र ज्यावर तुमच्या मंत्रालयाची मोहर असते, आम्ही मोहरून जातो व अभिमानाने आमच्या मुलांना,आप्तेष्टांना दाखवितो व ती पत्रं आम्ही

मौल्यवान ठेवा म्हणून जतन करून ठेवतो.

ताई साहेब मंत्री असताना माझं एक काम होतं त्यांच्या कडे..

एका कार्यक्रमात मी त्यांना भेटलो.पण गर्दीच एवढी की, मी काम सांगू शकलो नाही.पुन्हा थोड्या वेळानंतर दुसऱ्या ठीकाणी त्यांचा कार्यक्रम एका मोठ्या ,भव्य

हॉल मध्ये चालू होता,मी तिथे गेलो, प्रचंड गर्दी..

मी हॉलच्या दारावर उभा असलेलं ताईंनी पाहिलं,त्यांनी त्यांच्या पी.ए.ला कांहीतरी सांगितले.ते पी.ए .साहेब माझ्याकडे आले व म्हणाले , " सर तुमचं काय काम

आहे ते कागदावर लिहा, तुमचा फोन नंबर लिहा व तो कागद माझ्याकडे द्या."

तो कागद मी पी.ए.कडे दिला,कार्यक्रम संपला,ताई मुंबईच्या दिशेने निघाल्या .

जेमतेम अर्धा तास झाला असेल ,ताईंचा फोन आला , " सर, तुमचं काम झालं."

किती ही तत्परता ! सामान्यांबद्दलची आत्मियता !

आणखी असाच एक प्रसंग.माझ्या नातवाने दिग्विजय, दहावीची परीक्षा दिली, त्याला अकरावीला लातूरच्या शाहू कालेज मध्ये प्रवेश पाहिजे होता,त्याकाळी

मराठवाड□तील मंत्र्याच्या शिफारसीने शाहू कालेज मध्ये एक की दोन जागा भरत.

मी ताई साहेबांची भेट घेतली,कामाबद्दल बोललो ,ताई म्हणाल्या ," दहावीचा निकाल लागल्या बरोबर माझ्या परळीतल्या ऑफीसला नातवाचे नाव मार्क्स

लिहून द्या.

कांही दिवसांनंतर दहावीचा निकाल लागला , मी त्याच्या गुणपत्रिकेची प्रत घेऊन जायचं ठरवलं.

पण मला आश्चर्याचा धक्काच बसला.

दुपारी दोन च्या आसपास ताईंच्या ऑफीसचा माणूस माझ्या घरी आला व माझ्या नातवाचे नाव मार्क्स ही माहिती घेऊन गेला.परळीतल्या बऱ्याच लोकांना ही

शिफारस पाहिजे होती,त्यात शहरातील बरीच मान्यवर मंडळी होती पण ताईंनी माझ्याच नातवाच्या नावाची शिफारस केली.व एका बैठकीत बोलून दाखविले,

" तुम्ही मोठे लोक,तुमच्या पाल्याला कुठेही प्रवेश देऊ शकाल पण माझ्या गुरुजींनी काय करावे ?

ताईंचे हे वाक्य मी कधीच विसरणार नाही .

हे आहेत आमच्या ताई साहेबांचे गरीबाविषयीचे श्रीमंत विचार !

मी अगदी साहेबांच्या काळापासून भगवान गडावरील त्यांचे भाषण व अलीकडे सावरगाव येथील पंकजाताईंचे भाषण टी.व्ही. वर ऐकतो व संध्याकाळी सोने व

पेढे घेण्यासाठी त्यांच्या घरी जातो.सन 2023 च्या दसऱ्याच्या आदल्या दिवशीच ताई साठी एक शेर लिहला व तो दसऱ्याच्या दिवशी त्यांच्या भेटीत त्यांना

दाखवावा असं ठरवून तो कागद खिशात ठेवला,आश्चर्याची गोष्ट अशी की तोच शेर ताईंनी त्यांच्या भाषणात सांगितला.

मी घरी गेलो, ताई आल्या नव्हत्या,प्रज्ञा वहिनींना मी तो कागद दिला व म्हणालो, " वहिनीसाहेब, मला ताई बद्दल जे वाटतं ते मी शेर मधून सांगणार होतो पण

तोच शेर दुपारच्या भाषणात ताईंनी आधीच सांगितला .

तो शेर असा ,

" माना की औरों के मुकाबले कुछ पाया नही मैने,<br>
पर खुश हूं की,खुद को गिराकर कुछ उठाया नहीं मैने ।"

....पंकजाताईंचा एक एक गुण अगदी वाखाणण्या सारखा !

पंकजाताई अतिशय धैर्यशील, संयमी व प्रसंगावधनी आहेत.

स्व.साहेबांचा अंत्यविधी !

संपूर्ण महाराष्ट्रातून नव्हेतर देशभरातून लोक अंत्यविधीला आलेले,

लोकांचा शोक,राग व त्यांचा भावनाउद्रेक पाहून हा जनसागर केंव्हा उसळेल ?

मला त्यावेळी पंकजा काय आहे हे कळलं.

स्वतःच्या वडीलांच्या चितेला अग्नी द्यायचा आहे, लोक शोक, गोंध□, आक्रोश करीत आहेत, " अमर रहे, अमर रहे च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आहे.

तो खवळलेला जनसागर शांत करण्या साठी, चितेवरच्या त्या बापाची लेक,स्वतःला सावरून, स्वतःचे दुःख बाजूला सारुन,त्या दुःखात बुडालेल्या लोकांची माय

होऊन त्यांचे सांत्वन करत, त्यांना शांत राहण्याचे आवा।न करत होती.

खरंच ताई ! हे सगळं कुठून आलं हो तुमच्यात !!

....लोकसभेतल्या पराभवानंतर ताई परळीला आल्या. त्यांना भेटायची हिम्मत होत नव्हती.बरेच लोक भेटी साठी आले होते,मी पण गेलो.ताई पायऱ्यां उतरून

खाली आल्या, मी सामोरा गेलो.

ताई कडे पाहिल्यावर माझ्या डोक्यात अश्रु।

ताईंनी मला पाहिलं ,मलाच धीर दिला.धीर देताना त्यांच्या डोळ्यातली चमक जणू सांगत होती.

"विझले जरी आज मी,हा माझा अंत नाही.<br>
पेटेन्ट उद्या नव्याने,हे सामर्थ्य नाशिवंत नाही ! "

......

आणि आज ते खरेच ठरले.ताईंना विधान परिषदेची उमेदवारी मिळाली.ताई आमदार झाल्या.

15 डिसेंबर 2024 ला माझ्या नातीचे लग्न होते बार्शीला.त्यापूर्वी ताई गोपीनाथ गडावर हेलिकॉप्टर ने आल्या होत्या.हेलिकॉप्टर लॅन्ड होताच मी त्यांना नातीच्या

लग्नाची पत्रिका दिली.ताई लग्नाला येईन म्हणाल्या .मी खूश झालो.पण लग्नाच्या दिवशी कळाले, ताई येणार नाहीत.मी नाराज. लग्न घटीका समीप आली,

तेव्हढ्यात लग्न मंडपात वैद्यनाथ बॅन्केचे चेअरमन आदरणीय विनोद शेठ सामत येताना दिसले.

मी स्वागतासाठी सामोरा जातो तो ते म्हणाले, " आपल्या ताई कॅबिनेट मंत्री झाल्या..

माझ्या नातीचं लग्न आणि त्या लग्नात ही शुभ वार्ता !

मला खरंच त्या दिवशी ," आनंद गगनात मावेना ' या वाक्प्रचाराचा अर्थ कळला !!

.....आज आमच्या सर्वांच्या लाडक्या पंकजाताई महाराष्ट्र राज्याच्या मंत्री आहेत.उत्तरोत्तर त्यांची खूप प्रगती होणार आहे.याची आम्हाला खात्री आहे.

पंकजाताई खूप मोठ्या आहेत,आणखीही मोठ्या होणार आहेत. त्यांना कांही सल्ला देणे उचित नाही.पण मी एक शिक्षक आहे,सल्ला दिल्या शिवाय शिक्षकाला

राहवत नाही.म्हणून माझ्या वाचनात आलेली-Robert Frost यांची कविता माझ्या शिष्ये साठी उद्धृत करतो.

" Woods are lovely,<br>
dark and deep<br>
I have many promises to keep<br>
miles to before I sleep<br>
And miles to go before I sleep..

आजच्या या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन करताना आशीर्वाद देतो की," उत्तरोत्तर तुमची प्रगती होऊन तुमच्या हातून लोकसेवा घडावी व लोकसेवे साठी

परमेश्वर तुम्हाला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य देवो !

ईश्वरापुढे माझं खाली मागणं मागून दोन शब्द संपवितो.

" देव जरी मज कधी भेटला<br>
माग हवे ते माग म्हणाला<br>
म्हणेन प्रभू रे<br>
माझे सारे जीवन देई मम शिष्याला !

# पंकजा गोपीनाथ मुंडेः महाराष्ट्रातील खंबीर स्त्री नेतृत्व!



वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा, पंकजाताई! आपल्या कार्यास अधिक यश लाभो, आरोग्य लाभो, आणि महाराष्ट्रात एक सक्षम, समर्पित आणि लोकहितैषी नेतृत्व बळकट होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

मातीतून उगम पावलेली, लोकांमध्ये नांदणारी आणि नेतृत्वाच्या शक्तीने महाराष्ट्राच्या राजकारणाला नवे वळण देणारी एक खंबीर स्त्री म्हणजे पंकजाताई गोपीनाथ मुंडे. आज, 26 जुलै 2025 रोजी त्यांचा 46 वा वाढदिवस साजरा होत आहे. त्यांच्या जिद्द, कर्तृत्व आणि समाजकार्याची ही कहाणी आजच्या युवा पिढीसाठी एक प्रेरणास्त्रोत ठरत आहे.

पंकजा मुंडे यांचा जन्म 26 जुलै 1979 रोजी बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे झाला. त्या महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री आणि लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांची जेष्ठ कन्या आहेत. त्यांच्या अंगात नेतृत्वाचे गुण जन्मतः होते. अमेरिकेतून व्यवस्थापनातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी राजकारणात सक्रिय पाऊल ठेवले आणि 2009 साली परळी मतदारसंघातून प्रथमच आमदार म्हणून निवडून आल्या.

पुढील दशकात त्यांनी महाराष्ट्र सरकारमधील महत्त्वाची खाती सांभाळली – ग्रामीण विकास, महिला व बालकल्याण, मृद व जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, पर्यटन इत्यादी. त्यांच्या कार्यातून समाजातील दुर्बल, ग्रामीण, महिला आणि ओबीसी घटकांसाठी त्यांनी अनेक योजनांची आखणी केली. जलयुक्त शिवार, स्वयंसहायता गट प्रोत्साहन, महिला सबलीकरण उपक्रम, दुष्काळ निवारण कार्य यासारख्या अभियानांमध्ये त्यांनी स्वतः सहभाग घेतला आणि जनतेचा विश्वास संपादन केला.

त्यांच्यावर एकदा चिक्की घोटाळ्याचा आरोप झाला, पण त्यांनी पूर्ण पारदर्शकतेने भूमिका मांडून आरोप फेटाळले आणि भ्रष्टाचारविरोधी विभागाकडून क्लीनचिट मिळवली. “जर मी चुकीची असेन, तर मी राजकारणच सोडीन” अशी ठाम भूमिका घेणाऱ्या पंकजा मुंडेंचा हा आत्मविश्वास आणि नीतिमत्ता आजही प्रेरणा देणारी आहे.

वडिलांच्या निधनानंतर त्यांनी ‘गोपीनाथ गड’ या स्मारकाची निर्मिती करून त्यांची सामाजिक कार्याची परंपरा पुढे चालवली. या स्मारकातून शैक्षणिक शिष्यवृत्ती, कौशल्य प्रशिक्षण, आरोग्य उपक्रम, महिला सक्षमीकरण योजना या माध्यमातून हजारो लोकांच्या आयुष्यात बदल घडवून आणला.

राजकारणाच्या पलीकडेही पंकजा मुंडे यांचं नेतृत्व सर्वत्र जाणवतं. त्यांनी ‘शिवशक्ती परिक्रमा’ नावाची एक धार्मिक-आध्यात्मिक यात्रा सुरु करून संपूर्ण राज्यभरातील 11 शक्तीपीठ व ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतले. यामागचा उद्देश सामाजिक एकात्मता आणि सांस्कृतिक जागृती होता. या यात्रेला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दसरा मेळावा, हा ओबीसी, बहुजन समाजाच्या सशक्तीकरणाचा उत्सव ठरलेला आहे. गोपीनाथ मुंडे यांनी सुरु केलेली ही परंपरा पंकजा मुंडे यांनी सावरगाव येथे नव्याने सुरु केली आणि प्रत्येक वर्षी या मेळाव्यात लाखोंचा जनसागर उसळतो. त्या या समुदायाच्या दुःखदुखांमध्ये सहभागी होतात, त्यांना न्याय मिळावा यासाठी विधानसभेपासून रस्त्यापर्यंत आवाज उठवतात.

2024 लोकसभा निवडणुकीत त्यांना बीडमधून अपक्ष उमेदवाराकडून पराभव पत्करावा लागला, मात्र त्यांनी हार मानली नाही. त्यांनी लगेचच विधान परिषदेची निवडणूक जिंकून मंत्रीपद पुन्हा मिळविले. आज त्या महाराष्ट्राच्या पशुपालन, पर्यावरण आणि जलवायू परिवर्तन मंत्री आहेत तसेच भाजपाच्या राष्ट्रीय सचिव आणि मध्यप्रदेशच्या प्रभारी म्हणूनही जबाबदारी सांभाळत आहेत.

त्यांनी “लोकनेता गोपीनाथ मुंडे” नावाचा एक सुंदर फोटोबायोग्राफी ग्रंथ लिहिला आहे, जो फक्त आठवणींचे नव्हे तर एका संघर्षशील नेत्याच्या कार्याची दस्तऐवजीकरण करणारा ग्रंथ आहे.

त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातही त्यांचा संयम, कुटुंबाशी नाते जपण्याची वृत्ती, आणि प्रामाणिकपणा यामुळे त्या खऱ्या अर्थाने ‘संघर्षकन्या’ ठरतात. त्यांचे पती अमित पालवे आणि मुलगा आर्यमन यांचं सहकार्यही त्यांचं बळ आहे.

आज, त्यांच्या वाढदिवसानिमित्त राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि सर्वसामान्य जनता त्यांच्या यशाचा गौरव करत आहे. संघर्ष, प्रामाणिकपणा आणि कार्यक्षमतेचा संगम म्हणजे पंकजा मुंडे. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांचं योगदान आजवरच नव्हे, तर भविष्यात अधिक प्रभावशाली ठरणार आहे, यात शंका नाही.

वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना डॉ. सुवर्णा कराड प्रदेशाध्यक्ष वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र राज्य पंकजा मुंडे म्हणजे महाराष्ट्रातील महिलांच्या आत्मविश्वासाचा चेहरा, तरुणाईच्या प्रेरणेचा झरा आणि संघर्षशील नेतृत्वाची ठिणगी आहे असे म्हटले आहे.



**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य , दापोली - जिल्हा रत्नागिरी.**

परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
# संघर्षनेता




# वंचितांची माऊली



आज महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री मा.ना. पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस ज्या ओळखल्या जातात रणरागिनी, संघर्षकन्या आणि लोकनेत्या या नावांनी.

त्यांच्या जीवनाचा प्रवास हा फक्त एका व्यक्तीचा नाही, तर तो एका कुटुंबाच्या वारशाचा, एका समाजाच्या आशेचा आणि एका राज्याच्या विकासाचा प्रवास आहे. लोकनेते

गोपीनाथराव मुंडे साहेबांची कन्या असलेल्या पंकजाताईंचा हा प्रवास 2009 पासून आजपर्यंत संघर्षमय, प्रेरणादायी आणि हृदयाला स्पर्श करणारा आहे. आजच्या या वाढदिवसाच्या

निमित्ताने, त्यांच्या या अद्भुत आयुष्याचा एक छोटासा आलेख...! ज्यामध्ये त्यांच्या प्रत्येक पावलात मातृस्नेह, निर्धार आणि लोकहिताची ज्योत दिसते.

पंकजाताईंचा प्रवास 2009 पासून सुरु झाला, जेव्हा त्यांनी राजकारणाच्या कुरुक्षेत्रावर पहिले पाऊल टाकले. तेव्हा त्या एका प्रचार सभेतून जिल्हा परिषदेच्या

निवडणुकीच्या निमित्ताने राजकारणात उतरल्या. पण हा प्रवास कधीच सोपा नव्हता. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांची कन्या म्हणून त्यांच्यावर अपेक्षांचा डोंगर होता. ते

वडिलांचे पाऊलखुण ठरले पाहिजे, अशी अपेक्षा होती. आणि त्यांनी ती अपेक्षा पूर्ण केलीच. 2009 मध्ये, परळी मतदारसंघातून त्या पहिल्या महिला आमदार झाल्या. हा क्षण फक्त

एक निवडणुकीचा विजय नव्हता, तर तो एका संघर्षकन्येच्या विजयाचा होता. परळीच्या त्या पहिल्या आमदार बनल्या त्यावेळी त्यांना रणरागिणी असे संबोधले गेले. कारण

त्यांनी राजकारणात प्रवेश केला नाही, तर एका नव्या संकल्पाने आपले नाव इतिहासात घडवले! त्यांच्या या यशामागे त्यांचा तो तगडा निर्धार होता, जो आजही त्यांच्या प्रत्येक

निर्णयात दिसतो.

पण जीवनातील खरी परीक्षा 2014 मध्ये आली, जेव्हा लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांचे दु:खद निधन झाले. तो क्षण कोणत्याही कुटुंबासाठी वेदनादायी असतो, पण

पंकजाताईंकरिता तो एक मोठा धक्का होता. वडिलांच्या अनुपस्थितीत, त्यांनी संपूर्ण कार्यकर्त्यांची जबाबदारी मायेने आणि मातृत्वाने सांभाळली. ते म्हणतात ना, "मातृहृदयात

जेवढे प्रेम असते, तेवढे दुसऱ्या कुणातही नसते." पंकजाताईंनी तेच केले. कार्यकर्त्यांना बळ देऊन, त्यांना प्रेरणा देऊन, त्यांनी वडिलांच्या वारशाला पुढे नेले. हा काळ त्यांच्या

जीवनातील सर्वाधिक भावनिक होता. अनेकांना वाटले की, यानंतर पंकजाताई थांबतील, पण त्यांनी उलट, अधिक जोमाने कामाला लागल्या. 2014 मध्ये भारतीय जनता पार्टीच्या

सत्तेत त्यांना जलसंधारण आणि ग्रामविकास महिला व बालविकास मंत्रीपदाची संधी मिळाली. ही संधी त्यांनी सोन्याच्या पावडरसारखी हाताळली. महाराष्ट्रात "गाव तिथे विकास"

हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून, त्यांनी प्रत्येक गावात निधी वळवला. जलसंधारणाची मोठी कामे करून, राज्याला सुजलाम सुफलाम केले. प्रत्येक गावात पाणी, रस्ते, शाळा आणि

आरोग्य सुविधा पोहोचवण्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. हे काम फक्त राजकीय नव्हते, तर ते एका मातृहृदयाचे होते, जे आपल्या राज्याच्या प्रत्येकाला सुखी पाहायचे होते.

आज, 2024 मध्ये, पंकजाताई पुन्हा एकदा मंत्रीपदी आहेत – पर्यावरण आणि पशुसंवर्धन खात्याची जबाबदारी अत्यंत यशस्वीपणे सांभाळत आहेत. या काळात त्यांनी महाराष्ट्राला

हिरवेगार करण्याचे स्वप्न पाहिले आहे. पर्यावरण मंत्रालयाच्या माध्यमातून विविध विकासकामे आणि लोकोपयोगी निर्णय घेतले आहेत. वृक्षारोपण मोहीम, प्रदूषण नियंत्रण,

वन्यजीव संरक्षण, गोवंश संवर्धन, प्लास्टिकमुक्त मोहिमा पशुसंवर्धनासाठीच्या योजना – प्रत्येक निर्णयामध्ये त्यांचा तोच हातखंडा दिसतो. त्यांनी केलेल्या कामांमुळे अनेक गावे

बदलली आहेत, लोकांचे जीवन सुधारले आहे. मंत्री या नात्याने पंकजाताई मुंडे यांनी पशुसंवर्धन विभागाला कृषी विभागाचा दर्जा देवुन देशातील पहिले राज्य म्हणुन मान

पटकावला. आज या निर्णयामुळे पशु पालकांना मोठा फायदा मिळणार आहे. ते म्हणतात, "पर्यावरण हे फक्त झाडे-झुडपे नव्हे, तर ते आपले भविष्य आहे. या शब्दांमध्ये त्यांचे

हृदय उमटते, जे लोकांच्या हितासाठी धडधडते. पंकजाताई मुंडे यांचा प्रवास हा फक्त राजकीय यशाचा नाही, तर तो एका माणसाच्या हृदयाचा प्रवास आहे. त्यांच्या या प्रवासात

अनेक अडचणी आल्या, पण त्यांनी प्रत्येक वेळी मातृस्नेहाने त्या पार केल्या.पंकजाताई, तुम्ही महाराष्ट्राचा अभिमान आहेत. तुमच्या या संघर्षाने लाखो लोकांना प्रेरणा दिली आहे.

त्यांनी अनेक अडथळ्यांवर मात करून, स्त्री असो किंवा नेता या संकल्पनांना नवी ओळख दिली आहे. त्या फक्त राजकारणी नाहीत, तर एक शिक्षिका, नेता आणि आई आहेत,

ज्यांनी आपल्या कार्याने प्रत्येक घरात प्रेरणा पसरवली आहे. तुमचे हृदय, जे वडिलांच्या वारशाला जपते आणि लोकांच्या हितासाठी धडकते, ते कायम तसेच राहो. तुमच्या

भविष्यातील प्रत्येक दिवस उत्कृष्ट आणि सुखकारक व्हावा, मा.ना. ताईसाहेब आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो हीच प्रभु वैद्यनाथ चरणी प्रार्थना

चौकट

----

पदापलिकडचं मायेचं नातं

मी, 2009 सालापासून मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या परळी येथील संपर्क कार्यालयात कार्यरत आहे. गेली पंधरा वर्षे मी त्यांना अगदी जवळून पाहतोय. बाहेरच्या जगासाठी त्या

महाराष्ट्राच्या एक शक्तिशाली मंत्री आहेत, एक रणरागिनी आहेत, संघर्षकन्या आहेत, लोकनेता आहेत. पण आमच्यासारख्या त्यांच्यासोबत रात्रंदिवस काम करणाऱ्या

कर्मचाऱ्यांसाठी त्या या सगळ्या भूमिकांच्या पलीकडे जाऊन, आमच्या 'ताईसाहेब' आहेत - मायेची पाखर घालणाऱ्या, जिव्हाळा लावणाऱ्या आणि आपुलकीने विचारपूस करणाऱ्या

आमच्या कुटुंबप्रमुख ! त्यांनी कधीही आम्हाला केवळ 'कर्मचारी' म्हणून वागवले नाही. पहिल्या दिवसापासून त्यांनी एक कुटुंब तयार केलं, जिथे प्रत्येक सदस्याला महत्त्व होतं,

प्रत्येकाच्या मताचा आदर होता. राजकारणाचा व्याप वाढत गेला. त्या मंत्री झाल्या, त्यांच्यावर महाराष्ट्राची जबाबदारी आली. बैठका, दौरे, सभा प्रचंड वाढल्या. मुंबईतील

मंत्रालयापासून ते राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत त्यांना फिरावे लागते. पण या धावपळीत, या प्रचंड मोठ्या जबाबदारीत स्टाफला कधीच विसरत नाहीत. आजही त्यांचा परळीत

दौरा असला की, त्या कार्यालयात आल्यावर कामाच्या सूचना देण्याआधी आपुलकीने विचारतात. "मिलिंद, कसा आहेस? घरी सगळं ठीक आहे ना? हा प्रश्न वरवरचा नसतो, त्यात

एक कमालीचा जिव्हाळा असतो. महाराष्ट्राच्या एका मोठ्या मंत्री आपल्यासारख्या सामान्य कर्मचाऱ्याच्या कौटुंबिक अडचणींची, इतक्या आपुलकीने चौकशी करतात, तेव्हा ऊर

अभिमानाने भरुन येतो. हे केवळ माझ्यासोबतच घडत नाही, तर कार्यालयातील प्रत्येक लहान-मोठ्या सहकाऱ्यासोबत त्या याच मायेने वागतात. कुणी आजारी असेल तर त्याला

आधार देणं, कुणाच्या घरी कार्य असेल तर आवर्जून शुभेच्छा देणं, हे त्यांच्या स्वभावातच आहे.

आज त्या पुन्हा एकदा मंत्री आहेत. पर्यावरण, पशुसंवर्धन यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी त्यांच्यावर आहे. त्यांचा बहुतांश वेळ मुंबईत आणि राज्याच्या

दौऱ्यात जातो. तरीही परळी कार्यालयाशी त्यांची नाळ घट्ट जोडलेली आहे. फोनवरून त्या इथल्या प्रत्येक गोष्टीची माहिती घेतात. पण त्यापलीकडे जाऊन, आमच्याशी बोलताना

त्या आजही आमच्या ' ताईसाहेब'च असतात. त्यांच्या आवाजात तीच माया, तोच जिव्हाळा आणि तीच आपुलकी असते. एका बाजूला संपूर्ण राज्याचा भार समर्थपणे सांभाळायचा

आणि दुसऱ्या बाजूला आपल्यासोबत काम करणाऱ्या माणसांना मायेने जपायचं, ही तारेवरची कसरत फक्त ताईसाहेबांसारखी विशाल हृदयाची व्यक्तीच करु शकते. त्यांच्यासाठी

आम्ही केवळ कर्मचारी नाही, तर त्यांच्या परिवाराचा एक अविभाज्य भाग आहोत, ही भावनाच आम्हाला काम करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा देते. राजकारणाच्या पलीकडे

जाऊन, माणुसकी आणि जिव्हाळ्याचं नातं कसं जपावं, याचं त्या मूर्तिमंत उदाहरण आहेत. अशा 'लोकनेत्या' आणि 'मायेच्या ' ताईसाहेब यांच्यासोबत काम करण्याची संधी

मिळाली, हे मी माझं भाग्य समजतो.



मिलिंद कांबळे

# लोकनेत्याचा खरा वारसा

महाराष्ट्राच्या राजकारणात ठाम पाऊल रोवणाऱ्या नेतृत्वांमध्ये पंकजाताई मुंडे यांचं नाव विशेष मानाचं आहे. संघर्षातून उभं राहिलेलं हे नेतृत्व केवळ वडिलोपार्जित वारशामुळे नव्हे, तर आपल्या कर्तृत्वाने आणि लोकसंग्रहाने वेगळं ठरतं. बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागांपासून रामटेक बंगल्यापर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास म्हणजे जिद्द, दूरदृष्टी आणि कार्यक्षमतेचा उत्तम प्रत्यय आहे.जनतेशी नाळ कायम घट्ट ठेवत, विकासकामांना सर्वोच्च प्राधान्य देण्याची त्यांची प्रामाणिक भूमिका उल्लेखनीय आहे.त्यांच्या नेतृत्वात लोकसहभाग, पारदर्शक प्रशासन आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यांचा सुंदर संगम दिसून येतो.

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावशाली आणि करारी नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस! जनतेच्या हक्कांसाठी सातत्याने लढणाऱ्या, ग्रामीण भागाच्या विकासासाठी झटणाऱ्या, आणि युवाशक्तीला प्रेरणा देणाऱ्या या नेत्याच्या वाटचालीकडे नेहमीच महाराष्ट्रभराचे लक्ष लागलेले असते.आजचा दिवस केवळ एका राजकीय व्यक्तिमत्वाच्या वाढदिवसाचा नाही, तर जनतेच्या हक्कांसाठी झगडणाऱ्या, ग्रामीण महाराष्ट्राला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणाऱ्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या कर्तृत्व, दातृत्व, नेतृत्व व अथांग सागरासारख्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस आहे.पंकजाताई या नेतृत्वाला सामाजिक जाण, संवेदनशीलता आणि ठाम निर्णयक्षमता यांची समृद्ध साथ आहे. अनेक संघर्ष, अनेक कठिण प्रसंग आले मात्र त्यांचे नेतृत्व राजकारणात ठाम अस्तित्व टिकवूनच नव्हे तर झळाळून निघाले.

## ➡ _लोकनेत्याचा वारसा केवळ चालवलाच नाही तर अधिक बळकट केला_

----------------

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा वारसा केवळ राजकीय नसून सामाजिक जाणिवांनी परिपूर्ण होता. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा राजकीय वारसा चालवणे ही सोपी बाब निश्चितच नाही.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा वारसा पंकजाताईंनी केवळ जपला नाही, तर तो अधिक बळकट केला आहे. वंचित उपेक्षित, शेतकरी शेतमजूर, उसतोड कामगार ,महिला या घटकांना सामावून घेत सामाजिक न्याय, महिला सबलीकरण, शिक्षण, ग्रामविकास आणि रोजगार या क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामविकास मंत्री म्हणून काम करताना त्यांनी अनेक उपक्रम हाती घेतले आणि ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले. त्यापद्धतीने आता पर्यावरण मंत्री तसेच पशुसंवर्धन मंत्री म्हणून काम करतांनाही त्यांनी आपलं वेगळेपण व सामाजिक भान जपल्याचं त्यांच्या प्रभावी कामातून आणि निर्णयांतून सिद्ध होत आहे.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा सामाजिक जाणिवांनी परिपूर्ण तोच वारसा पंकजा मुंडे यांनी समर्थपणे पुढे नेला आहे.



महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी स्वतःचं स्वतंत्र आणि ठाम स्थान निर्माण केलं आहे.

## ➡ _लाखोंचं प्रेरणास्थान...._

---------------------

पंकजाताईंच्या नेतृत्वगुणांमुळे त्या केवळ एक राजकारणी म्हणून नव्हे, तर लाखोसाठी एक प्रेरणास्थान ठरल्या आहेत. स्त्री ही केवळ दर्शक नसून परिवर्तनाची वाहक असते हे त्यांनी आपल्या कार्यातून सातत्याने सिद्ध केले आहे. पंकजाताई मुंडे यांची जनतेशी असलेली नाळ आणि त्यांच्या भाषणातील ठामपणा लाखों लोकांच्या मनात घर करून राहतो. कार्यकर्त्यांसाठी त्या केवळ नेत्या नाहीत, तर एक प्रेरणास्थान, मार्गदर्शक आहेत. त्यांच्या एका वाक्यावर अन् एका छोट्याशा कृतीतून प्रेरणा घेत लाखोंजण उर्जित वाटचाल करतात. वंचित, उपेक्षित घटकांचा तसेच ज्यांचा कोणी वाली नाही अन् वाणी नाही अशा लक्षावधी लोकांचा महाराष्ट्राच्या राजकारणातील ठाम व वबुलंद आवाज पंकजाताई बनलेल्या आहेत.

➡ _

## जनसामान्यांच्या विकासाचे ‘टेक ऑफ’: ‘रामटेक’_

--------------------

आज घडीला पुन्हा एक विलक्षण योगायोग घडलेला आहे तो म्हणजे मंत्री म्हणून पंकजाताई ‘रामटेक’ या शासकीय निवासस्थानातून आपले काम करत आहेत. 1995 मध्ये शिवसेना- भाजप युतीचं सरकार सत्तेवर आलं आणि गोपीनाथराव मुंडे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री झाले. त्यावेळी ‘रामटेक’ हा बंगला दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचं निवासस्थान होता. विशेष म्हणजे पंकजाताई मुंडेंना मंत्री झाल्यानंतर मलबार हिलवरील हाच ‘रामटेक’ बंगला मिळाला, हा योगायोगच म्हणावा लागेल. ‘रामटेक’ केवळ वास्तू नाही, तर अनेक दिग्गज नेत्यांचा साक्षीदार आहे. पंकजाताई मुंडेंची या वास्तुशी भावनिक नाळ आहे. त्यांच्या वडिलांची आठवण, स्वतःच लहानपण आणि त्या वास्तूशी असलेलं नातं ही बाब यामध्ये अधोरेखित होते.पंकजाताई मुंडेंचं लोकांशी असलेल्या घट्ट नात्याबरोबरीनेच ‘रामटेक’वरुन घेतल्या जाणाऱ्या न्याय्य व धोरणात्मक निर्णयाने महाराष्ट्रात एक आश्वासक विश्वासाचं नातंही घट्ट होत आहे. त्यामुळेच जनसामान्यांच्या विविध विकासकामांचे ‘टेक ऑफ’ ‘रामटेक’ वरुनच होत आहे. पंकजाताई मुंडे याच निवासस्थानातून लाखोंच्या समस्यांवर धोरणात्मक निर्णय घेत आहेत. त्यामुळे सदैव गजबजलेला व गर्दीने दाटलेला ‘रामटेक’ आणि बाजूस असणारा अरबी समुद्र - जणू वंचित, उपेक्षित, पिडीत घटकांना न्याय मिळवून देणाऱ्या अथांग जनसागराचे हे नेतृत्वही अनुभवत आहे. पंकजाताई मुंडे यांचं कार्य हे अनेक अर्थाने प्रेरणादायी व प्रभावशाली आहे. त्यांच्या बोलण्यात स्पष्टपणा आणि त्यांच्या कृतीत प्रामाणिकपणा सदैव दिसतो.

## ➡ _ मंत्री म्हणून प्रभावी काम_

--------------------

पर्यावरण व पशुसंवर्धन खात्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतर, पंकजाताई मुंडे यांनी या विभागात अनेक ठोस आणि परिणामकारक निर्णय घेतले आहेत. पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने त्यांनी लोकसहभागाची एक लोकचळवळच उभी केली आहे. पशुसंवर्धन विभागांतर्गत ऐतिहासिक निर्णय घेऊन पशुसंवर्धनाला कृषीचा एक शाश्वत दर्जा मिळवून दिला आहे.

वन विभागाच्या समन्वयाने ‘हरित महाराष्ट्र अभियान’ पुन्हा गतीमान केलं आहे. वृक्षलागवड आणि जंगल संवर्धनासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांबरोबर कार्य आराखडा तयार करण्यात आला आहे. प्लास्टिक निर्मूलन मोहीमेला तर पंकजाताईंनी एक प्रभावी लोकचळवळ बनवली आहे. प्लास्टिकमुक्त महाराष्ट्रासाठी विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. विशेषतः धार्मिक स्थळे, बाजारपेठा आणि पर्यटनस्थळी प्लास्टिक बंदी अंमलात आणण्यात ताईंची भूमिका ठोस आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन या दोनही विभागात बदल्या किंवा नोकरभरती याबाबत अतिशय प्रभावी व सकारात्मक असे धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांनी आपल्या कामाची छाप पाडलेली आहे. पर्यावरण असो की पशुसंवर्धन यामध्ये शाश्वत संवर्धनासाठी संशोधन, ग्रामस्तरावरील जनजागृती यावर भर देण्यात आला आणि त्याचे सकारात्मक परिवर्तन परिणामकारक ठरतांना दिसत आहेत.यातूनच पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात पर्यावरणपूरक, सशक्त, आणि समन्यायी विकासाची बीजे पेरली जात आहेत.



रविंद्र जोशी परळी

परळी संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता..




# वसा आणि वारसा....



राजकारण आणि समाजकारण यांचा एकत्रित उपयोग जनतेच्या कल्याणासाठी करून सामाजिक उत्थानाचा वसा पुढे नेण्यात अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्रातील असंख्य मुंडेंप्रेमींच्या गळ्यातील ताईत, लोकनेत्या मा.ना. पंकजाताई मुंडे यांचा आज (26जुलै) वाढदिवस.

महाराष्ट्रात अनेक राजकीय घराणे आहेत. अनेकांचे वारस राजकारणात आले, मात्र राजकारणाबरोबरच समाजकारण सोबत घेऊन वसा पुढे नेणारे क्वचितच. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी सुरु केलेला सेवायज्ञ तेवत ठेवत रंजल्या गांजल्यांची सेवा हाच आपला धर्म मानत पंकजाताई मुंडे यांनी आपला प्रवास सुरु ठेवला आहे. राजकारणात महिला राजकारणी खूप कमी, त्यात स्वतः निर्णय घेण्याची क्षमता असणाऱ्या तर खूपच कमी. पंकजाताई मुंडे राजकारणात आहेत त्या आपल्या स्वबळावर. कमावलेल्या जनतेच्या आशीर्वादावर व आपल्या समाजसेवेच्या घेतलेल्या अविरत वसा यावर. 2009 पासून जनतेशी जुळलेले नाते 16 वर्षांनंतर आणखी घट्ट झाले आहे. जय-पराजय या स्थितीच्या कित्येक मैल पुढे आता पंकजाताई आलेल्या आहेत. जनतेच्या मनावर अधिराज्य असणाऱ्या या नेत्याला आता लोकनेता म्हणून गणले जाते आहे.

अनेक संकटे, संघर्षाच्या वाटेवरून चालून पंकजाताई आता सर्वसामान्यांचे जीवन सुकर व्हावे यासाठी कायम प्रयत्नशील असतात. आपल्या पहिल्या मंत्रिपदाचा काळात जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्र पुन्हा एकदा पाणीदार तर शेत शिवार हिरवीगार केली. गरीब शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक प्रगतीची दारे उघडी केली. माझी कन्या भाग्यश्री योजना मुलींना भविष्यात शिक्षण व विवाह यासाठी उपयोगी पडणारी सर्वात लोकप्रिय योजना ठरली आहे. आज प्रत्येक घरातील मुलींचा माझी कन्या भाग्यश्री योजनेत सहभाग आहे. ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून अनेक गावांपर्यंत पक्का रस्ता पोचला. वैद्यकीय अडचणीत गावखेड्यातील खराब रस्त्यांमुळे अनेकांची मृत्यू झाले. मात्र मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून आज पंकजाताई यांच्या दूरदृष्टीने गावोगावी पक्के रस्ते योजना आली व खराब रस्त्यांमुळे तुटलेली ही गावे शहरांशी जोडली गेली. पंकजाताई व माजी खासदार प्रितमताई यांनी घेतलेली महाआरोग्य शिबीरे महाराष्ट्रात सर्वात मोठ्या आरोग्य शिबीरांपैकी शिबिरे होती. या आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून अनेक मोठी खर्चिक उपचार गरजू रुग्णांवर मोफत करण्यात आली. ज्यांनी आर्थिक कारणांमुळे उपचाराची आशा सोडून दिली होती अशा अनेक रुग्णांवर यात मोफत उपचार करण्यात आली.द टर्निंग पॉईंट च्या माध्यमातून मतदारसंघातील प्रत्येक शाळेपर्यंत पोचून गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. अनेक मोठमोठे वक्ते या कार्यक्रमात आणून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. सर्वसामान्य घरातील वधूवरांचे राजेशाही थाटात लग्न लावत सामुदायिक विवाह कार्यक्रम घेत त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक मदत केली. महिलांचा आवडता सण असलेला गौरी गणपती. गौरी गणपती स्पर्धा घेत प्रत्येक घरातील महिलांच्या कलागुणांना वाव देण्याचा अनोखा प्रयत्न पंकजाताई यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून केला. कोरोना काळात रेशन, वैद्यकीय उपचार देत त्यांनी आपला सेवाधर्म पाळला. अश्या एक न अनेक योजना, कार्यक्रम घेऊन सर्वसामान्य रुग्णांना, महिलांना, विद्यार्थ्यांचे जीवन सुकर केले.

आज ना. पंकजाताई मुंडे पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात महत्वाच्या मंत्रिपदावर विराजमान झालेल्या आहेत. पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन सारखे संवेदनशील खाते त्यांच्याकडे आहे. परळीत आधुनिक पशुवैद्यकीय दवाखाना व पशुवैद्यकीय महाविद्यालय त्यांनी मंजूर केले आहे. याचा परळीकरांना मोठा फायदा होणार आहे. मंत्रिपद मिळताच त्यांनी अनेक निर्णय घेत राज्याचे पर्यावरण पुन्हा एकदा शुद्ध करण्यासाठी धडाकेबाज निर्णय घेतले आहेत. भविष्यात ना. पंकजताई मुंडे यांच्या रूपाने व जनतेच्या प्रेमाने घेतलेला वसा आणि वारसा चालत राहील.

पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसाच्या निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा



**अश्विन मोगरकर,**
**परळी वैजनाथ.**












परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
# संघर्षनेता




## ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या परळीत ''युथ आयकॉन'' पत्रकार विलास बडे यांचे व्याख्यान

### युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे- किशोर केंद्रे, प्रशांत कराड



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दि. 27 जुलै रोजी परळीत प्रसिद्ध वक्ते, आयबीएन लोकमतचे उपसंपादक विलास बडे यांच्या व्याखानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याखानाला युवक आणि नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजपाचे युवक कार्यकर्ते किशोर केंद्रे व प्रशांत कराड यांनी केले आहे.

माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी युवकांना मार्गदर्शन मिळावे यासाठी ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. रविवार दिनांक 27 जुलै रोजी सकाळी 11 वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे विलास बडे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम होणार आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. त्या



आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी आणि युवकांनी मोठ[illegible]ा संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आवाहन भाजपाचे युवक कार्यकर्ते किशोर केंद्रे व प्रशांत कराड यांनी केले आहे.

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या होणाऱ्या कॅन्सर रोगनिदान शिबीराचा लाभ घ्यावा-अनीश अग्रवाल महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष

परळी प्रतिनिधी ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी शहरात सामाजिक सेवा उपक्रमात कॅन्सर रोगनिदान शिबीर होत आहे. या शिबिराचा गरजूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भाजपा सोशल मीडिया व आय टी सेल महाराष्ट्र प्रदेशचे अनिश अग्रवाल यांनी केले आहे.

पर्यावरण वातावरण बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित शहर भाजपच्या वतीने सामाजिक सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रविवार, दि 27 जुलै रोजी कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरास संभाजीनगर चे तज्ञ डॉक्टर शैलेश अग्रवाल तोंड व घसा कर्करोग तपासणी करून निदान करणार आहेत. डॉ शैलेश अग्रवाल हे मराठवाड्यातील तज्ञ डॉक्टर आहेत. हजारों कर्करोगग्रस्त रुग्णांवर त्यांनी उपचार केले आहेत. डॉ शैलेश अग्रवाल यांच्या बरोबरच या शिबिरास रेडिएशन कर्करोग तज्ञ डॉ. उत्पल गायकवाड व मेडिकल ऑनकोलॉजिस्ट डॉ केतन शिरसाट तपासणी करणार आहेत. वेदांत होमिओ क्लिनिक, नाथ रोड, औद्योगिक वसाहत येथे रविवार, 27 जुलै 2025 रोजी सकाळी 11नेते 3 वाजेपर्यंत कॅन्सर रोगनिदान शिबीर होत आहे.

तोंड आणि जिभेवर दीर्घकाळ टिकणारे फोड, डाग, आवाज बदल, थायरॉईड नोड्युल, अन्न गिळण्यात अडचण व वेदना, तंबाखू गुटख्यामुळे तोंड कमी उघडणे, तोंडातून रक्त येणे तसेच भरून न येणारी जखम, अचानक कमी होणारे वजन, शरीरावर आलेली गाठ, सततचा ताप, थकवा, भूक न लागणे असे लक्षणे असणाऱ्यांनी नोंदणी करिता 9822291637या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा व

या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भाजपा सोशल



मीडिया व आय टी सेल महाराष्ट्र प्रदेशचे अनिश अग्रवाल यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री सहायता निधी मधून रुग्णांना मिळून दिली पन्नास हजाराची मदत- कैलास कावरे



सिरसाळा प्रतिनिधी .महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ भाई शिंदे साहेब संसद रत्न खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे मंगेश चिवटे सर ,कार्याध्यक्ष शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष रामहरी राऊत व आरोग्यसेवक युवासेना निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या सहकार्याने युवा सेनेचे विधानसभा प्रमुख कैलास कावरे यांनी विशेष प्रयत्न करून सिरसाळा येथील दिलीप देवकर यांच्या आई आश्रुबाई बजरंग देवकर रा.सिरसाळा यांना नी रिप्लेसमेंट या आजारावरील उपचाराकरिता मुख्यमंत्री सहायता निधीतून पन्नास हजार रुपयाची मदत मिळवून दिली उपचाराकरिता विशेष प्रयत्न करून संबंधित कुटुंबाला रुग्णसेवक कैलास कावरे यांनी मोठा आधार दिला आहे रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हा प्राण मनात बाळगून उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी वैद्यकीय सेवेचा घेतलेला वसा आणि त्यांचे सेविक्री म्हणून बाजीराव दादा चव्हाण यांच्या पेरणेतून त्यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे हे अनेक रुग्णांच्या मदतीसाठी सहकार्य करत आहेत देवकर कुटुंबियांनी उपमुख्यमंत्री सहायता कक्ष यांचे व कैलास कावरे यांचे आभार मानले आहेत

## श्री. रत्नेश्वर विद्यालय, परळी येथील प्रा. श्री. रमेश ज्ञानोबा सरवदे सर ''महाराष्ट्र रत्न पुरस्काराने'' सन्मानित




प्रतिनिधी (परळी वै): मनोहर अंबा. नगरीतील एक चतुरस्त्र व्यक्तिमत्व असलेले आणि संगीत क्षेत्रातील एक तळपता तारा, एक व्यासंगी व्यक्तिमत्व, समाजकारण, राजकारण इ. क्षेत्रात अग्रेसर, वेळोवेळी सर्वांच्या मदतीला धावून जाणारे प्रसिद्ध व्यक्ती, विद्यार्थी प्रिय अध्यापक, पं. शिवदासजी देगलूरकर सर यांचे पट्ट शिष्य, स्वरांजली संगीत महाविद्यालयाचे संचालक. असे एक ना अनेक बिरुदावली मिरविणारे प्रा. श्री रमेश ज्ञानोबा सरवदे सर यांना यावर्षीचा आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारा तसेच शिक्षणक्षेत्र, वैज्ञानिक, सांस्कृतिक सांगितिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल दिला जाणारा * महाराष्ट्र रत्न पुरस्कार -2025 * हा मा. डॉ. श्री. अविनाश संकुडे (आंतरराष्ट्रीय मानव अधिकार राजदूत, संस्थापक तथा अध्यक्ष) श्री. रवीजी अग्रवाल (अध्यक्ष, अनुर्वी फाउंडेशन) मा. श्री. गणेश विटकर (संस्थापक तथा अध्यक्ष, आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन) त्याचबरोबर अभिनेत्री फाल्गुनी झेंडे व अभिनेत्री रंजना सिंग यांच्या हस्ते पंडीत जवाहरलाल नेहरु सभागृह घोले रोड शिवाजीनगर पुणे येथे सदरील पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून ते मनोहर अंबाजोगाई नगरीमध्ये आपली संगीत कलेची साधना करतात. शास्त्रीय

## जि.प.के.प्रा.शाळा सिरसाळा येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

### » तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेटचा स्तुत्य उपक्रम




सिरसाळा /प्रतिनिधी तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.माजलगाव शाखा सिरसाळाच्या वतीने येथील जि.प.के. प्रा. शाळेत इयत्ता पहिली वर्गात प्रवेश घेतलेल्या 40 विद्यार्थ्यांना स्कूल बॅग सह वह्या पेन्सिल,खोडरबर पुस्तके इ. शैक्षणिक साहित्याच्या 'वेलकम किटचे ' वाटप दि.24 जुलै रोजी करण्यात आले. यावेळी शालेय समिती अध्यक्ष अन्वर पठाण, मुख्याध्यापक मधुकर घोडके, केंद्रप्रमुख वैजनाथ मुंडे सामाजिक कार्यकर्ते सय्यद अय्युबभाई ,शाखा व्यवस्थापक वाघ साहेब, यांच्यासह मल्टिस्टेटचे आदिनाथ शेजुळ, धनंजय निरपणे अक्षय काळे आदींची उपस्थिती होती.

मागील अनेक वर्षांपासून तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट संस्था सामाजिक बांधिलकी जोपासत गोर गरीब विद्यार्थी शिकत असलेल्या जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी यासाठी जिथे जिथे आमच्या शाखा आहेत तिथे असा उपक्रम राबवत असते . असे आदिनाथ शेजुळ यांनी सांगितले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक लक्ष्मण वैराळ यांनी तर आभार मधुकर घोडके यांनी मानले

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंदानी परिश्रम घेतले.












समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
परळी
# संघर्षनेता

























